# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/८०) /२०१४. दिनांक ११ /११/२०१४.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुकीस मान्यता देणेबाबत...**

**संदर्भ :** आपले कार्यालयाचे टपालाव्दारे व ई-मेल व्दारे प्राप्त प्रस्ताव अनुक्रमे,
१. जा.क्र.जिउनि/विनियम/नि/प्रस्ताव/४४३६/२०१४ दि.०१/११/२०१४ व
२. जा.क्र.जिउनि/विनियम/नि/ प्रस्ताव/ /२०१४ दि.१०/११/२०१४.

उपरोक्त संदर्भाकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- आपले कार्यालयाचे उक्त २ प्रस्तावान्वये वाशिम जिल्ह्यातील दि.०१/०४/२०१३ ते ३१/१०/२०१४ अखेर **निवडणुकीस पात्र 'ड' वर्गामधील एकुण ८ (अनुक्रमे ७ + १ = ८)** सहकारी संस्थाच्या निवडणुक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांचे नेमणुकीस मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावातील ८ **संस्थांच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या नेमणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम,२०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन आपल्या जिल्ह्यातील निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील ८ संस्थांच्या प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक (दोन्ही दिवस वगळुन) यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे **१५ दिवसांची मुदत** असेल याची दक्षता घ्यावी.
२. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
३. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत करावयात.
४. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.
५. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.
६. संस्थांवर **बिगर शासकीय व्यक्तीची नेमणुक** केली आहे, त्याबाबत त्यांच्यांकडुन आवश्यक अर्ज व विहीत नमुण्यातील शपथपत्र संबंधीत निवडणुक अधिकारी यांनी प्राप्त करुन घ्यावे.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी.

**परिशिष्ट अ**

**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४ दि. / /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट**

| अ.क्र. | तालूक्याचे नाव | सहकारी संस्थेचे नाव | प्राधीकृत अधिकारी यांचे नाव व हूद्दा |
|---|---|---|---|
| 1 | रिसोड | बलखंडेश्वर पाणीवापर सहकारी संस्था मर्या., चिंचांबापेन, र.नं.- 1119, ता.रिसोड जि.वाशिम | श्री. एस. व्ही. चिनगोले, से.नि. शाखा सचिव, अकोला जिल्हा देखरेख सहकारी संघ मर्या. अकोला |
| 2 | --,,-- | कृषीगंगा पाणीवापर सहकारी संस्था मर्या., गोभणी, र.नं.-1120, ता.रिसोड जि.वाशिम | ऍंड.श्री.एन.आर. अवचार, से.नि. व्यवस्थापक, दि. अकोला जिल्हा मध्यवर्ती सह. बँक मर्या.,अकोला |
| 3 | रिसोड | जिजामाता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., रिसोड, र.नं.-1118, ता.रिसोड जि.वाशिम | श्री. एस. व्ही. चिनगोले, से.नि. शाखा सचिव, अकोला जिल्हा देखरेख सहकारी संघ मर्या. अकोला |
| 4 | **कारंजा** | श्रध्दा गृहनिर्माण सहकारी संस्था म. कारंजा र.नं.778 | श्री डी.डी.ढोले, प्र.ले.प. सह.संस्था कारंजा (E.N.16104) |
| 5 | **कारंजा** | व्दारका गृहनिर्माण सहकारी संस्था म.कारंजा र.नं.765 | श्री डी.डी.ढोले, प्र.ले.प. सह.संस्था कारंजा (E.N.16104) |
| 6 | **कारंजा** | आशाताई गावंडे महिला गृहनिर्माण सहकारी संस्था म. कारंजा र.नं.766 | श्री.एस.व्हीं.डेहणीकर, प्र.ले.प. सह.संस्थाकारंजा ( E.N.16677) |
| 7 | **कारंजा** | मराठा सेवा संघ गृहनिर्माण सहकारी संस्था म. कारंजा र.न.762 | श्री.एस.व्ही.डेहणीकर, प्र.ले.प. सह.संस्थाकारंजा ( E.N.16677) |
| 8 | वाशिम | रेल्वे हमाल कामगार सहकारी संस्था म.वाशिम र.न.105 | श्री संजय भ. बाजड प्र.ले.प.सह.संस्था वाशिम ( E.N.15743 ) |

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे